REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# भारतीय अर्थव्यवस्थेत विशेष आर्थिक क्षेत्राची भूमिका

प्रा. डॉ. आसावरी आर.दुर्गे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , कोराडी.

## प्रस्तावना

भारत हा विकसनशील देश आहे तेव्हा भारतीय अर्थव्यवस्था विकसित करण्याच्या दृष्टिकोणातून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मागील सहा दशकात सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. परंतु आर्थिक विकासासाठी सरकारने केलेले प्रयत्न फारसे यशस्वी झाले नाही. असा विचार घेऊन केन्द्रसरकारने उद्योग क्षेत्राला नविन आधार देण्यासाठी, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत टिकून राहण्यासाठी, देशाच्या औद्योगिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी तसेच निर्यात वाढीसाठी एप्रील 2000 मध्ये स्पेशल इकॉनॉमिक्स झोन (SEZ) धोरणाची घोषणा केली. तत्कालीन वाणिज्य मंत्री मुरासोली मारन यांनी चीनला भेट देऊन तेथील विशेष आर्थिक क्षेत्राच्या माध्यमातून झालेली प्रगती पाहून ते प्रभावित झाले. त्यामुळे त्यांनी 1997 ते 2002 या काळातील व्यापार निर्मिती करण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालविले. थोडक्यात चीन मध्ये सेझचे यश लक्षात घेऊन भारतात सेझचा स्वीकार करण्यात आला. केन्द्र सरकारने 23 जून 2004 मध्ये सेझ संबंधीचे विधेयक संसदेमध्ये पास केले. 10 फेब्रुवारी 2006 पासून सेझ संबंधीच्या कायद्यांची अंमलबजावणी वेगाने सुरू झाली. या कायद्यानुसार देशांतर्गत विशेष आर्थिक क्षेत्र उभारण्याची जबाबदारी खाजगी/सार्वजनिक, परदेशी कंपनी सोबतच काही ठिकाणी एम.आय.डी.सी. (M.I.D.C.) सारख्या महामंडळावर टाकण्यात आली. भारतात विशेष क्षेत्राची संख्या 142 वरून 403 पर्यंत गेली असून त्यापैकी जवळपास 267 प्रस्तावांना शासनाने मंजुरी दिलेली आहे.

## विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ)

विशेष आर्थिक क्षेत्र म्हणजे विशेष आर्थिक दर्जा दिलेला भुप्रदेश होय. त्याचे आर्थिक कायदे हे देशाच्या वैशिष्ट्यपूर्ण आर्थिक कायद्यापेक्षा शिथिल असतात.

केन्द्र सरकारने पुरस्कृत विशेष आर्थिक क्षेत्रांना विशेष आर्थिक धोरणांचा लाभ देण्यासाठी उद्योगा संबंधीचे कायदे, नियम यात लवचिकता असते. सरकारने धोरण व कायदे अशा क्षेत्रांसाठी इतर क्षेत्रांपेक्षा वेगळे असतात. म्हणून त्यांना विशेष आर्थिक क्षेत्र असे म्हणतात. थोडक्यात विशेष आर्थिक क्षेत्र हे असे क्षेत्र आहे की , ज्यांमध्ये उभारल्या जाणाऱ्या उद्योगांना अनेक प्रकारच्या सवलती सुविधा दिल्या जाणार आहे. जसे आयकर व प्रशुल्कामध्ये सूट, स्वतःचे स्वतंत्र व्यवस्थापन, स्वतंत्र उद्योगासंबंधी धोरण, पायाभूत सुविधा (पाणी, रस्ते, वीज, टेलिफोन इ) हवाई अड्डे (बंदरांची निर्मीती) कच्च्या मालाच्या खरेदीवर सुट, स्वतंत्र वसाहती इ. होय.

## विशेष आर्थिक क्षेत्रांची उद्दिष्टे




अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्रांच्या माध्यमातून उद्योगधंद्याचा विस्तार करून रोजगार वृद्धी व आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ घडवून आणणे हा सेझचा मुख्य उद्देश असला तरी त्याशिवाय भारतात सेझ निर्मितीचे इतर उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

१) देशातील पायाभूत सुविधांचा विकास करणे.
२) संझच्या माध्यमातून देशात परकीय (भांडवल) गुंतवणूक आकर्षित करणे.
३) सेझच्या माध्यमाने रोजगार संधीत वृद्धी घडविणे.
४) अर्थव्यवस्थेत औद्योगिक विकासाला चालना देणे.
५) देशाच्या आर्थिक विकासातील क्षेत्रीय/प्रादेशिक असमतोल कमी करणे.
६) मुक्त व्यापार धोरणाचा अवलंब करून देशाची अर्थव्यवस्था खुली करणे.
७) निर्यात वाढीसाठी सर्वप्रकारचे प्रयत्न करणे.
८) आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ करणे.
९) परकीय चलन मिळविणे.

## सेझ एक दृष्टिक्षेप

विशेष आर्थिक क्षेत्राची संकल्पना तब्बल चार दर्शकांपूर्वी तैवानने जगासमोर ठेवली. निर्यातोन्मुख, निर्यातप्रधान अशा वेगवान आर्थिक विकासाचे "मॉडेल" केवळ 72 हेक्टरच्या एका भूपट्ट्यावर उभारले. तैवानच्या या प्रयोगाचे अनुकरण केले ते त्याचाच सख्खा शेजारी असणाऱ्या दक्षिण कोरियाने. तिथून पुढे मग या अनुकरणाची जणू लाटच आली. आज चीन आणि भारतासारखी वजनदार आशियाई राष्ट्रेही याच लाटेवर स्वार झालेली दिसतात. जगातील 120 देशामध्ये सेझ राबविले जात आहे. चीनच्या निर्माती मध्ये सेझ उद्योगाचा 40% वाटा आहे. अर्थातच साम्यवादी विचार सरणीमुळे तिथे सेझला असे यश मिळाले.

भारतामध्ये नियोजनाच्या माध्यमातून व मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार करून समाजवादी समाजरचना निर्माण करण्याच्या हेतूने भारत सरकारने धोरण आखले तसेच विदेशी व्यापाराला चालना देण्यासाठी 1965 मध्ये कांडला (गुजरात) येथे पहिले "मुक्त व्यापार केन्द्र" सुरू केले. 1997 ते 2002 या काळात आयात निर्यात धोरणामध्ये सुधारण करून मार्च 2002 मध्ये सेझची संकल्पना स्विकारली. निर्यात वाढविण्यासाठी जे विविध प्रयत्न झाले त्यामधील अलिकडच्या काळात प्रकर्षाने पुढे आलेली व बहुचर्चित योजना म्हणजे सेझ होय.

जगात सुमारे 120 पेक्षा अधिक देशात (विशेष आर्थिक क्षेत्र) सेझ प्रकल्प कार्यरत आहेत. त्याची संख्या 2000 इतकी आहे.

भारतात विशेष आर्थिक क्षेत्राची संख्या 142 वरून 403 पर्यंत गेली असून त्यामधील प्रमुख 08 (विशेष आर्थिक क्षेत्र) सेझ हे सांताक्रुझ (महाराष्ट्र), कोचीन (केरळ), कांडला व सुरत (गुजरात), चेन्नई (तामिळनाडु), विशाखापट्टणम (आंध्रप्रदेश), फाल्ट (पश्चिम बंगाल), नोएडा (उत्तरप्रदेश) मध्ये कार्यरत आहेत. तसेच महाराष्ट्रात पुणे, मुंबई, ठाणे, रायगड, जिल्ह्यात मोठ्याप्रमाणात सेझची निर्मिती होणार आहे. 403 विशेष आर्थिक क्षेत्रांपैकी महाराष्ट्रात 75 सेझ उभारणीला केन्द्र सरकारने मंजुरी दिली आहे. म्हणजेच सर्वात जास्त सेझ महाराष्ट्र राज्यात निर्माण होत आहे. महाराष्ट्रात पहिले सेझ नवी मुंबई येथे 2001 मध्ये 3800 हेक्टर आकारमानाचे सिडको मार्फत उभारण्यात आले. मुंबई सेझ व नवी मुंबई सेझ असे दोन प्रकल्प महाराष्ट्रात क्रांती घडवून आणू पाहत आहेत. नवी मुंबई सेझ (महामुंबई) पनवेल, उरण, पेण (जि. रायगड) या तालुक्यात उभारला जाणार असून त्यासाठी 10,000 हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. स्थानिक रहिवासी आणि शेतकऱ्यांनी या महामुंबई सेझ प्रकल्पास प्रचंड विरोध केला आहे. नंदीग्रामच्या धरतीवर आंदोलने उभारले जात असून त्याला सर्वच स्तरातून निषेध होत असल्यामुळे त्याची वास्तविकता तपासून पाहणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील एकूण 75 सेझ प्रकल्पामध्ये बहुतांश प्रकल्प मुंबई – पुणे – रायगड जिल्ह्यात उभे राहत आहे. विदर्भाच्या वाट्याला केवळ 07 सेझ प्रकल्प येत असल्यामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण होणार आहे. सर्वसामान्य जनतेचा सेझच्या माध्यमातून विकास होणार का? सामान्य लोकांचे प्रश्न सुटतील का? कामगारांचे हित साधून कल्याण होणार का? या सारख्या प्रश्नाचे उत्तर सेझ मधून प्राप्त करणे गरजेचे आहे.

## भारताची विशेष आर्थिक क्षेत्रासंबंधी भूमिका

भारताचे विशेष आर्थिक क्षेत्रामुळे गुंतवणुकीतील वाढ, रोजगार निर्मिती, निर्यात वृद्धी आणि पायाभूत सुविधांचा विकास हे चार प्रमुख फायदे वाणिज्य मंत्रालयातर्फे 5 ते 6 अब्ज डॉलर्ससह 1,00,000 कोटी गुंतवणूक होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. सन 2007–08 मध्ये 67.300 कोटी रू. ची निर्यात होईल असाही अंदाज व्यक्त केला आहे. सर्व 234 विशेष आर्थिक क्षेत्र ज्यांना औपचाहिरक मंजुरी प्राप्त झाली आहे ते कार्यान्वित झाले तर 300000 कोटी रू. ची गुंतवणुक आणि 40 लाख नवीन रोजगार संधी उपलब्ध होतील असे म्हटले आहे.

## विशेष आर्थिक क्षेत्राच्या कायद्याची काही ठळक वैशिष्ट्ये

१) सेझ मध्ये उभरण्यात येणाऱ्या उद्योगांना उत्पादन शुल्क लागणार नाही.
२) देशांतर्गत विक्रीकर लागणार नाही.
३) सेक्युरिटीज ट्रान्झेक्शन टॅक्स लागणार नाही.
४) आयकरातून 15 वर्षापर्यंत खालील प्रमाणे कर लागणार नाहीत.
अ) पहिले 5 वर्ष 100% सूट
ब) नंतर 5 वर्ष 50% सूट
क) नंतरच्या 5 वर्षात प्राप्त लाभातून भांडवली गुतवणूक केल्यास लाभाच्या 50% आयकरातून सुट
५) विशेष आर्थिक क्षेत्र उभारणी करणाऱ्या संस्थांना सतत 10 वर्षे आयकरातून सुट.
६) विशेष आर्थिक क्षेत्राकरीता एकूण जागेच्या 25% जमिनीचा वापर औद्योगिक विकासासाठी तर उर्वरित 15% जमिनीचा वापर बिगर औद्योगिक कारणासाठी करण्यात येवू शकतो.
७) काही उद्योग वगळता इतर सर्व उद्योगात परदेशी गुंतवणूकीला 100% मुभा राहील.
८) विशेष आर्थिक क्षेत्रातील परदेशी बँकांच्या शाखा सुरू करण्यास मान्यता असून त्यांच्या नफ्यावर 3 वर्षासाठी आयकरात 100% सूट राहील.
९) कंपनी कायद्यात बदल करून कंपनीच्या संचालकपदी नियुक्त होण्यासाठी 12 वर्ष भारतात राहण्याची अट शिथील.
१०) उद्योगांना विनामुल्य पाणी पुरवठा.
११) उद्योगांना वीज पुरवठा सतत राहील तसेच 15 वर्षाकरीता विजेचा भार द्यावा लागणार नाही.
१२) कामगारांना संप, बंद, मोर्चे काढण्याकरीता बंदी.
१३) उद्योगांना झालेला तोटा पुढील लाभातून वजावटीकरीता पात्र राहील.
१४) उद्योगांना आयातीसाठी परवाना लागणार नाही.
१५) उद्योगांना आवश्यक भांडवलसामुग्री कच्च्या माल सुटे भाग, पॅकिंग सामुग्री इत्यादी कोणताही कर न देता देशातून प्राप्त करता येईल.

विविध सवलती या क्षेत्रांना मिळत असतांना एक बंधन त्यांच्यावर लादण्यात आले ते असेही उत्पादन सुरू केल्यापासून सलग 5 वर्षाच्या कालावधीत निर्यातीतून प्राप्त परकीय चलन व आयातीसाठी विविध खर्चासाठी लाभांश व व्याज इत्यादींची रक्कम प्राप्त चलनापेक्षा जास्त नको

एकूणच विशेष आर्थिक क्षेत्र म्हणजे देशांतर्गत स्वायत्त परकीय मुलूख असणार आहेत. साजजिकच ह्या सवलती प्राप्त करण्यासाठी खाजगी उद्योगांमध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे. विशेष आर्थिक क्षेत्रामुळे विकासाला चालना मिळेल, निर्यात वाढेल, अश्या भागात दळणवळण व दूरसंचाराच्या सेवा जागतिक स्तराच्या उपलब्ध होतील, सोबतच खेळाचे मैदाने, शाळा, महाविद्यालये, पंचतारांकित उपहारगृहे, सुसज्ज एकछत्री भांडारे या सर्वांमुळे रोजगाराच्या व्यापक संधी मिळतील अशी सुंदर स्वप्न रंगविली जात आहेत. वस्तुस्थिती तशी असेल यात शंका निर्माण होते. याचे कारण म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र संदर्भातील पुढील समस्या आहेत.

## विशेष आर्थिक क्षेत्रामुळे निर्माण होणाऱ्या समस्या

१) **शेती समस्या** : विशेष आर्थिक क्षेत्र उभारण्यासाठी भरपूर जमिनीची आवश्यकता लागणार आहे. भारताचे एकूण जमीनीचे क्षेत्रफळ 29, 73, 190 चौ.कि.मी. शेती योग्य क्षेत्रफळ 15,34,166 चौ.कि.मी. आहे. विशेष

आर्थिक क्षेत्राकरीता 1,40,000 हेक्टर एकूण जमीन उपयोगात आणली जाणार आहे या क्षेत्राकरीता शेतकऱ्यांच्या जमीनी घेण्यात आल्यामुळे त्यांच्या भविष्याचा विचार करण्याची गरज आहे. अन्यथा हाताला काम नसेल तर कोणताही उपक्रम या देशात यशस्वी होऊ शकणार नाही व जमिनीसाठी बंड आंदोलने, उपोषण इ. मार्गाचा अवलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२) **विस्थापित शेतकऱ्यांचे पुनर्वसन** : यात अनेक मोठे प्रकल्प (वीज, सिंचन, रस्ते. इ.) उभे करतांना शेतकऱ्याच्या जमिनी काढून घेण्यात आलेल्या आहेत. अनेक विस्थापित शेतकऱ्यांचं पुनर्वसन पूर्णपणे झालले नाही. अश्या वेळी सेझ साठी परत शेत जमिनी ताब्यात घेण्याचे कार्य होत असल्यामुळे हा प्रश्न गंभीर होईल. याची तीव्रता कमी करण्यासाइी सरकारने योग्य पाऊल उचलणे आवश्यक आहे.

३) **बेरोजगारीचा प्रश्न** : रोजगार निर्मितीच्या संधी म्हणून सेझ प्रकल्पाकडे पाहण्यात येत आहे. 2010 पर्यंत 15 लाख लोकांना रोजगार मिळेल असा दावा कमलनाथ वाणिज्यमंत्री यांनी केला आहे. मुळात बेकारी ही गंभीर समस्या असून केवळ खाजगी क्षेत्राला प्राधान्य देवून हा प्रश्न सुटु शकणार नाही.

४) **देशातील लघु उद्योग संपुष्टात येतील** : विशेष आर्थिक क्षेत्राला देण्यात येणाऱ्या सोयी सवलतीमुळे लघु व कुटीर उद्योग यांची पिछेहाट होऊन कालांतराने ते बंद पडतील. 70 ते 80 हजार लघु उद्योग मागील काही वर्षात बंद पडल्यामुळे या उद्योगाचे भविष्य अंधकारमय झाले आहे.

५) **आर्थिक विषमता वाढीस लागेल** : आपल्या देशाचा आर्थिक विकास व्हावा हे प्रत्येक भारतीयांचे स्वप्न आहे. मागील 8 ते 10 वर्षात भारतात वेगवेगळ्या क्षेत्रात कमालीचे बदल झाले आहे. त्याचा फायदा सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचले का? याचे उत्तर नकारात्मक मिळते. म्हणून जागतिकीकरणा प्रमाणे सेझ निर्मितीमुळे आर्थिक विषमता वाढणार असून श्रीमंत अधिक श्रीमंत, गरीब अधिक गरीब होणार आहे.

६) **सरकारी महसूलात घट** : या क्षेत्रातील उपयोगांना आयकर प्रशुल्क करामध्ये सुट, कच्च्या मालाच्या खरेदीवर सूट, पायाभुत सुविधा पुरविणे, वाहतुकीची साधने देणे यासारख्या बाबी पुरवुन सुद्धा त्यापासुन सरकारला उत्पन्न न मिळाल्यामुळे सरकारी उत्पन्नात घट होणार आहे.

७) **प्रादेशिक विषमता वाढणार** : भारतामध्ये आणि महाराष्ट्र राज्यामध्ये प्रादेशिक विषमता मोठ्या प्रमाणावर आहे. सेझच्या माध्यमातून ज्या ठिकाणी प्रकल्प उभे राहणार आहेत त्यामधून पुन्हा प्रादेशिक विषमता वाढणार आहे. जसे महाराष्ट्र 75, आंध्रप्रदेश 54, कर्नाटक 46, हरियाणा 46, तामिलनाडु 37, गुजरात 30, पश्चिम बंगाल 21 या सात राज्यांमध्ये एकूण सेझ प्रकल्पापैकी 72% सेझ प्रकल्प केन्द्रीत आहे. बाकी राज्यांचे काय हा प्रश्न प्रादेशिक विषमता वाढवणारा आहे. महाराष्ट्र राज्यात सुद्धा मुंबई, पुणे, ठाणे, रायगड या जिल्ह्यात उद्योग उभे होणार असून गडचिरोली सारख्या मागास व आदिवासी जिल्ह्यास काहीही मिळणार नाही.

वरील समस्या जरी सेझचे धोरण स्वीकारल्या मुळे निर्माण होत असल्या तरी सेझचे धोरण स्वीकारणे अपरिहार्य आहे. मात्र धोरणामध्ये काही महत्वपूर्ण सुधारणा घडूवन आणल्यास समाजहित साधणे शक्य होईल तसेच विरोधकांचा विरोध काही प्रमाणात कमी होईल.

१) सरकारने आपल्या मालकीच्या पडीत जमिनी सेझ करिता वापराव्यात.
२) मागास भागात सेझ प्रकल्प उभे करावे. म्हणजे मागास भागाचा विकास होईल.
३) सेझ प्रकल्पात शेतकऱ्यांचा सहभाग करावा.
४) प्रकल्प ग्रस्तांचे राष्ट्रीय पुनर्वसन धोरण तैयार करावे. त्यासाठी कायद्यात बदल करावा.
५) सेझ मधील प्रकल्पांना सरसकट सवलती न देता त्याचे प्रमाण कमी करावे म्हणजे सरकारी महसूल वाढायला हवा या दृष्टकोनातूनही विचार करावयास पाहिजे.
६) स्थानिक मुलभूत साधन संपत्तीचा विकास होईल अशाच उद्योगाची सेझ मार्फत उभारणी करून तेथील प्रदेश विकसित करणे.
७) सेझ प्रकल्पात तेथील स्थानिक लोकांना रोजगारास प्राधान्य देणे.
८) सेझ मार्फत शेतीसुधार प्रकल्प राबविण्यात यावे.
९) स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिन विकासाकरिता सेझ च्या कायद्यात बदल होणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे मुलभूत व सामाजिक सुधारण लक्षात घेऊन सेझचे सुधारणावादी धोरण अमलात आणणे गरजेचे आहे म्हणजे गरीब मागासलेल्या व सर्व बाबींनी ग्रस्त अश्या शेतकऱ्यांवर, कामगारांवर अन्याय न होता

सामाजिक हित लक्षात ठेवून सेझची उभारणी ही देशाच्या आर्थिक विकासाचा एक कायम दुरदृष्टी दर्शक टप्पा राहील. यात कोणतीही शंका नाही. त्यासाठी सर्व समावेशक गुण व त्याग असलेल्या नेतृत्वाची देशाला व उद्योग क्षेत्राला गरज आहे.

## संदर्भ सूची

१) Citizen's Report on Governance & Development 2007
२) अर्थसंवाद जून ऑगस्ट खंड 31 अंक 1
३) अर्थबोधपत्रिका जुन 2007 खंड 6 अंक 3
४) अर्थसंवाद एप्रील – जुन 2007 खंड 1
५) गोविलकर विनायक **"विशेष आर्थिक क्षेत्र कि विशेष आपत्ती क्षेत्र "** डिसेंबर 2006.
६) विशेष आर्थिक परिक्षेत्र डॉ. प्रकाश कुळकर्णी
७) httplenwikipedia.org./wiki/special/........Economiczone
८) स्वदेशी पत्रिका (ऑगस्ट नवी दिल्ली)
९) कुलकर्णी अरविंद – 'सेझ एक आवाहन लोकसत्ता वृत्तपत्र 17 फेब्रुवारी 2007
१०) किनारे प. रा. सेझ शाप/वरदान, लोकसत्ता, 4 डिसेंबर 2007.
११) संपादकीय लेख लोकसत्ता दि. 6 एप्रिल 2007

LBP PUBLICATION